Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE - CCLXIV (264)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE






Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

...International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 264 (CCLXIV)
ISSN : 2278-9308
November, 2020



| | | |
|---|---|---|
| 21 | स्त्रीवादी साहित्य | |
| 22 | मुळाटे श्रीधर सुधाकर<br>'राखीव सावल्यांचा खेळ' मधील स्त्री | 81 |
| 23 | प्रा. मोहन चव्हाण<br>१९९० नंतरच्या स्त्रीवादी कवितेतील जाणिवा | 84 |
| 24 | डॉ.फारुक अहमदसाब तांबोळी<br>स्त्री समाज सुधारक | 88 |
| 25 | प्रा.डॉ. शारदा गोविंदराव बंडे<br>गुप्तकालीन स्त्री जीवन | 91 |
| 26 | अमोल नानासाहेब मस्के<br>स्त्रीवाद : स्वरुप आणि संकल्पना | 93 |
| 27 | प्रा. अडसुळे एस. पी.<br>प्राचीन भारतीय विदुषी स्त्री रत्न घोषा और विश्ववारा का वैदिक ग्रंथों में योगदान<br>प्रा. विकास भानुदास टकले | 95<br>97 |
| 28 | भांडे – कपडे करणा–या स्त्री मजुरांची भुमिका व समस्या<br>डॉ. रविंद्र बापुराव शेंडे/ प्रा. स्वप्नील एस. बोबडे | 102 |
| 29 | राजमाता जिजाबाई कार्य की प्रासंगिकता डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | 106 |
| 30 | महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व प्रा. डॉ.आंधळे बी. व्ही. | 108 |
| 31 | ग्रामीण स्त्रियांच्या समस्या :एक ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ बाबासाहेब शेप | 113 |
| 32 | मराठी कवितेतील स्त्री-जाणीवा डॉ.कैलास इंगळे | 120 |
| 33 | अठराव्या शतकातील स्त्रीया आणि गुलामगीरी<br>डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट | 124 |
| 34 | लोकसाहित्य चळवळीच्या लोकनेत्या- डॉ. सरोजिनी बाबर प्रा.डॉ. विकास शंकर पाटील | 127 |
| 35 | प्रा. ऍ. अल्का बाबाराव सोमवंशी<br>वाटचाल ८ मार्च ची | 130 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान प्रमोद एस. मेश्राम | 133 |
| 37 | नाना शंकर शेठ यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य<br>डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 137 |
| 38 | डॉ० विश्वजीत कुमार नवीन<br>जातक काल में नारी जीवन | 143 |
| 39 | समकालीन कामकाजी महिला और जीवन संघर्ष भारतीय<br>डॉ. जितेन्द्र कुमार पयासी<br>महिला: वर्तमान, भूत और भविष्य | 150 |
| 40 | मध्ययुगीन वेदनांची मुक्तीगाथा: संत सोयरा<br>विनायक पवार कृष्णा उत्तम नागरे | 152 |
| 41 | भारतातील महिलांची शैक्षणिक आणि आरोग्य विषयक सद्या स्थिती<br>कु. संगिता साहेबराव बोरसे | 155 |



Scanned with OKEN Scanner

# भांडे - कपडे करणा-या स्त्री मजुरांची भुमिका व समस्या

डॉ. रविंद्र बापुराव शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य महाविद्यालय ,वरोरा

प्रा. स्वप्नील एस. बोबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय ,बल्लारपूर

प्रस्तावना :

भारत हा महिलांचा शांतताप्रिय देश आहे. आपल्या देशाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती पर्याप्त असली तरी मानवी भांडवलाचा चांगला वापर करणे आवश्यक आहे. आज भारताची लोकसंख्या 121 (2011) कोटी आहे. यामध्ये स्त्रीयांची संख्या(46.48%) निम्मापेक्षा थोडी कमी आहे. तसेच शहरी भागात वास्तव करणारी लोकसंख्या(2011 नुसार 31.16%) दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यामुळेच पुढे भारतीय अर्थव्यवस्था शहरीप्रधान बनणारी वाटते.

ग्रामीण भागात रोजगार मिळविणे कठीण आहे. या खोट्या व भ्रामक कल्पनेमुळे लोक खेडे सोडत आहे व शहराकडे जात आहे. बरेचसे उद्योग, महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय व निमशासकीय कार्यालये शहरी भागात वाढत जात आहे. तसेच शहरी भागात नौकरीधारक, धंदेवाईक, उद्योजक, किरकोळ मजुरी करणारी लोकसंख्या वाढत आहे. शहरी भागात रोजगारीच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्या तरी रोजगार पात्र व्यक्ती व रोजगार संधी यात मोठा फरक आहे. रोजगार संधीचा अभाव व इतर कारणामुळे शहरात भांडे-कपडे करणारा स्त्री मजुरांचा वर्ग काही दशकापासून मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. या स्त्री मजुर वर्गाला बारामाही कामे उपलब्ध होत असल्यामुळे सहाजिकच असा स्त्री मजूर वर्ग वाढत जाणे अपेक्षित आहे. एक स्त्री साधारणताहा 5 ते 10 घरची कामे करून आपला उदरनिर्वाह पूर्ण करतांना पाहायला मिळते. श्रमाला प्रतिष्ठा व काम करणा-यांचा सन्मान या व्यूहरचेनतून या स्त्री मजुरवर्गाला कायदेशीर तसेच नैतिक पाठिंबा देणे आवश्यक आहे.

प्रो. पिगू च्या मते – "घर सांभाळणा-या स्त्रीसोबत त्या घरच्या पुरूषाने लग्न केल्यास राष्ट्रीय उत्पन्न कमी बनते आणि युध्दकाळात घरच्या स्त्रीया कामावर गेल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढते". प्रो. पिगू यांच्या विचारातून स्त्रियांचा राष्ट्रीय उत्पन्नातील छुपा वाटा बाहेर काढण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या कक्षेच्या दृष्टीकोणातून भांडे-कपडे करणा-या महिलाच्या रोजगाराची स्थिती अभ्यासनेही आवश्यक आहे. तसेच त्यांना येणा-या मर्यादा, मिळणारी वागणूक, त्यांचे अज्ञानपण आणि त्यांच्या कार्यामुळे त्यांना मिळणारे फायदे, समाजाला मिळणारे फायदे आणि एकंदर राष्ट्रांच्या एकूण मिळकतीत पडणारी भर याचा ढोबळमानाने अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्यात आला.

**बिज शब्द** - नवे जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, सर्वसमावेशन व्यूहरचना.

**संशोधनाची उदिष्ट्ये**

1) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरांच्या कामाचे व वेतनाचे स्वरूप याचा अभ्यास करणे.



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 264 (CCLXIV) | ISSN : 2278-9308 November, 2020

2) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरांचा वर्ग निर्माण होण्याची कारणे तपासने.

3) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुर वर्ग आणि घरमालकीन यातील संबंधाचा अभ्यास करणे.

4) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरांची सद्यस्थिती, संघटनात्मक व कायदेशीर तरतूदींचा अभ्यास करणे.

**संशोधनची गृहीते**

1) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरवर्गाला वर्षभर काम मिळत असले तरी त्यांना विविध आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

2) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुर वर्गाबद्दल समाजाचा दृष्टिकोन अंशता चांगला आहे.

3) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरवर्गासोबत वार्षीक वेतनवाढ, जादाकाम मोबदला इत्यादी तरतूदी नावापूरत्याच जुळून आहे.

4) वॉशींगमशीनमुळे भांडे – कपडे यातील कपडे धुने बंद पडण्याच्या मार्गात आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करून उपयुक्त असणारी माहीती संदर्भग्रंथ, मासिके, त्रैमासिक, प्रकाशित, अप्रकाशित शोधप्रबंध, इंटरनेट सेवा इ. माध्यमातून संकलित केली आहे आणि स्वअनुभवाचा वापर प्राथमिक सामुग्रीमध्ये करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचे विश्लेषण**

अर्थार्जनाचे कार्य पुरूषांचे आणि घरातील कार्य स्त्रीयांचे अशी कामाची वाटणी पुर्वी करण्यात येत होती. परंतु आता स्त्रीया शिकू लागल्या त्या त्यांच अस्तित्व निर्माण करू लागल्या किंवा घरातील उत्पन्न कमी म्हणून त्या उत्पन्न मिळविण्यासाठी घराबाहेर पडल्या आहे. ही निश्चितपणे भारतासारख्या देशासाठी जमेची बाजू आहे. ही जमेची बाजु असतांना खरोखर घराबाहेर पडणा-या भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुर वर्गाला श्रमाची प्रतिष्ठा मिळते काय? वेतन किफायतशीर मिळतात काय? आधुनिक काळात याचा अभ्यास त्या मजुरांच्या वैयक्तिक जीवणाबरोबरच राष्ट्राच्या आर्थिक जीवनासाठी अतिशय महत्वाचा आहे. निश्चितच यातील मर्यादा दूर होऊन क्षमतांचा विकास झाल्यास या स्त्रीवर्गामार्फत सुध्दा राष्ट्राचे आर्थिक जीवन सुंदर बनणारे आहे.

**अ) भांडे – कपडे करणारा स्त्री मजूरवर्ग निर्माण होण्याची कारणे**

भारतीय अर्थव्यवस्थेत लिंगानुसार स्त्री - पुरूष म्हणून श्रमविभागणी केली जाते. लिंगाआधारीत श्रमविभागणी, जातीव्यवस्था, आर्थिक दर्जा हे तिनही घटक परस्परसंबंधीत असलेले दिसून येतात. भांडे-कपडे करणारा स्त्री-मजूर वर्ग निर्माण होण्याची कारणे ढोबळमानाने पुढीलप्रमाणे सांगता येईल 1) सहजासहजी मिळणारा रोजगार 2) कुटुंबाला हातभार 3) पतीचे व्यसन 4) घटस्फोटीत किंवा विधवा स्त्री 5) संयुक्त कुटूंब 6) वर्षभर कामाची हमी 7) वाढती स्त्री बेरोजगारी 8) ग्रामीण - शहरी स्थानांतरण 9) जड कठीण कामे न करण्याची क्षमता 10) उत्पन्नाची पूर्ण हमी 11) कोणतेही कामे सारखेच असा दृष्टीकोन 12) शेतीतील कामांच्या अनुभवाचा अभाव 13) इतर धंद्यातील कोश्यल्याचा अभाव 14) जातीव्यवस्था 15) सहज सुरवात व पूढे कायम 16) घरापासुन जवळच्या परिसरात काम 17) आर्थिक परिस्थितीवर मात करणे,

या स्त्री मजूर वर्गाला वरील कारणामुळे भांडे-कपडे करावे लागतात. या महिलांना संपूर्ण घरकाम करावे लागलेच शिवाय उत्पन्नात भर घालण्यासाठी बाहेरची कामे, मोलमजुरीही करावी लागते. सुर्योदय ते सुर्यास्त, प्रसंगी 12 ते 18 तास कुटुंब चालविण्यासाठी हा स्त्री वर्ग काम कारतांना आढळतो. 8 तास काम हा नियम हा वर्ग पाडत नाही. काम व प्रतिष्ठा व इतरही गोष्टी या स्त्री वर्गाला मिळणे अपेक्षीत आहे. तरच देशाची एकूण मिळकत वाढण्यास मदत होईल.

**ब) भांडे – कपडे करणा-या स्त्री मजुरांसमोरील समस्या**

सुर्योदयापुर्वी आपला जीवनक्रम सुरू करणा-या वर्गामध्ये शेतकरी, शेतमजूर, छोटे धंदेचालक आणि हा भांडे – कपडे करणारा स्त्री वर्ग किंवा असा संबंधीत वर्ग येतो. या स्त्रीयांचे माहेर व सासर उपजीविकेसाठी सर्वस्वी किंवा अंशता अशा मजूरी क्षेत्रात कार्य करीत असते. हालाखीच्या आर्थिक परिस्थितीवर मात करणे, कुटुंबाकरीता उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे, कुटुंबाची विस्कटलेली घडी नव्याने नीट बसविणे, प्रसंगी घरच्या मंडळीचा विरोध मोडून काढावा लागतो. प्रथा, परंपरा व चालीरीतीशी संबंधीत अडथळयामधून मार्ग काढावा लागतो. उपहास व अपेक्षा सहन करीत स्वताचे प्रश्न निर्धाराने सोडवावे लागतात. भांडे कपडे करणा-या स्त्री मजुरांसमोरील समस्या पुढीलप्रमाणे आहेत. 1) कमी मोबदला तोही उशिरा मिळतो. 2) वार्षीक वेतनवाढ नाही 3) आठवडी सुट्टीचा अभाव 4) कामाव्यतीरीक्त काम 5) मालकीन - मजूर संबंध क्वचितच सलोख्याचे 6) थंडी-ऊन-पाऊस इत्यादीनुसार सोयी नाही. 7) पाहुण्यांच्या कपडे भांड्याचा त्रास व मोबदला नाही. 8) बाळंतपण व इतर प्रमुख कार्यक्रमांचा मोबदला अल्प 9) घरातील लहान मुले मोबदल्याच्या कक्षेत नाही. 10) समाजातील इतर वर्गाकडून मिळणारी निम्न वागणूक 11) स्वत:च्या व कुटूंबाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष 12) घरापासून बरेच दूर कामाचे ठिकाण 13) निम्न प्रतिच्या भेट वस्तू 14) अपत्य संगोपणाची समस्या 15) भविष्यकालिन तरतुदीचा अभाव 16) संघटनात्मकतेचा अभाव 17) इतर समस्या, खरोखर अशा सर्व समस्यावर उपाय व कायदेशीर तरतूदी निर्माण होणे आवश्यक आहे.

**क) भांडे कपडे करणा-या स्त्री-मजुरांबाबत मालक वर्गाच्या बाजूने समस्या**

1) न सांगता सुट्टीचा वापर 2) दरदिवशी उशिरा व अवेळी कामे 3) अॅडव्हान्स रक्कम/पूर्ण वेतन सुरवातीलाच मागणे 4) साफसुथरेपणाचा अभाव 5) क्षमतेपेक्षा जास्त घरची कामे व त्याचा सर्वांना त्रास 6) घरातील खाजगी माहिती इतर घरी पोहचविणे 7) कधी-कधी कामासाठी स्वत:च्या मुलींचा वापर 8) काम सोडून देण्याबाबत धमकी 9) कामातील अव्यवस्थितपणा कायम 10) कपडे मशीनच्या सहाय्याने धुण्याची मागणी व मोबदला सारखाच

मालकीन आणि स्त्री मजूर यांच्यातील संबंध अशा अनेक कारणामुळे बिघडलेले पहायला मिळतात. दोन्ही वर्गानी हे वरील प्रश्न समझोत्याने सोडविल्यास एक स्त्री दुस-या स्त्रीच्या उत्पन्नात गुणकपट वाढ करण्यास प्रेरक तत्व ठरणारे आहे.

**ड) स्त्री - मजुर वर्गाच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना**

प्रत्येक क्षेत्रातील (संघटीत किंवा असंघटीत) महिलांचे सक्षमीकरण म्हणजे देशाचा विकास ही बाब लक्षात घेऊन जाणीवपुर्वक प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. देशाच्या विकासाचा चढता आलेख विचारात

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 264 (CCLXIV)
ISSN : 2278-9308 November, 2020

घेतला तर त्यामध्ये महिलांचे योगदान ठळकपणे जाणवत आहे. महिलांकरीता करण्यात आलेल्या धोरणाचा हा परिणाम आहे. परंतु असे करीत असतांना 21 व्या शतकात येणा-या नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून महिलांच्या धोरणामध्ये बदल करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोर आव्हाने वाढत असल्याचे दिसून येते. यामध्ये भांडे कपडे करणारा स्त्री मजुर वर्गसुध्दा अपवादामध्ये मोडत नाही. महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे. यासाठी सर्व क्षेत्रामध्ये समान संधी व त्यांना आपले उदिष्ट साध्य करता येण्यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

स्त्री मजुर वर्गासोबत पुढील उपाय योजना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. 1) मजुरीत दरवर्षी अपेक्षीत वाढ व वेतन धोरण आधार 2) मोफत आरोग्याच्या व विमा सोयी 3) कामाच्या ठिकाणी सुरक्षितता 4) सामाजिक सुरक्षिततेच्या पूर्ण सोयी 5) कमी दराने अन्नधान्य 6) श्रमाची प्रतिष्ठा 7) समुपदेशन 8) स्वच्छतेबद्दलची वेळोवेळी जागृकता 9) वेळोवेळी येणारे बदल व संरचनात्मक परिवर्तन 10) संघटक यादृष्टीने पाहण्याची मानसिकता 11) याच वर्गातील मानसिक व आर्थिकदृष्ट्या परिघाबाहेर असणा-या स्त्रीयांकडे विषेश लक्ष.

उपक्रमशिलता, चिकाटी, परिश्रम, बुध्दीमत्ता यासारख्या गोष्टी पुरूषांप्रमाणेच स्त्रीयामंध्येही असतात. स्त्री ही पुरूषापेक्षा कमी नाही त्यामुळे छोटे- छोटे काम करणा-या महिलांचे योगदानही मोठ्या उपक्रमशीलता सांभाळणा-या महिलांसारखे आहे. त्यामुळे "एक राष्ट्र - एक स्त्री कायदा" यांची अमंलबजावणी भारतासारख्या महिला शांतताप्रिय देशात होणे अतिआवश्यक आहे.

## समारोप

पुरूष व महिला हे विकास प्रक्रियेचे बिंदू आहेत. नवे जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, बदलती सामाजिक परिस्थिती, वाढती महागाई आणि नवीन परिस्थितीमुळे स्त्रीयांना संधीची दालने खुली होत आहे. ज्यांच्याकडे कमी कौशल्य आहे त्यांच्यासाठी भांडे – कपडे करणे नवीन संधी आहे. कमी उत्पन्न, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत कमी सहभाग, कमी आत्मविश्वास, निर्णय प्रक्रियेत कमी सहभाग, हे स्त्रीयांचे दृष्टचक्र नष्ट करायचे असेल तर आरोग्याच्या सुविधा व त्यांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करणे महत्वाचे आहे. कुटुंबाकडूनही त्यांना या संदर्भात मदत मिळाली पाहिजे. या वर्गातील व सर्वच वर्गातील स्त्रीयांचा सन्मान व आदर करून वाटचाल केली तर आपल्या सर्वसमावेशक संस्कृतीचे वैभव आणखी वाढेल आणि याच वेळी ज्या स्त्रीया मानसिक, राजकीय ,पर्यावरण व आर्थिकदृष्ट्या परीघाबाहेर आहेत त्यांच्या गरजाकडे सर्वसमावेशन व्यूहरचनेतून विषेश लक्ष देणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

1) देशपांडे विनायक (2010), भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिशिंग, नागपूर
2) पाटील हेमलता, (2009), स्त्री आर्थिक व सामाजिक स्थिती' गोदा प्रकाशन, औरंगाबाद
3) पाटील लीला (1998), भारतीय स्त्री जीवन' मेघना पब्लिसिंग हाऊस, कोल्हापूर
4) योजना (मासिक), योजना भवन, संसदमार्ग, नई दिल्ली, 2015, पृ. 16
5) थोरात सुखदेव, (2012), दलित निरंतर विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.97



Scanned with OKEN Scanner